दाखल तारीख : २६/०७/२०१०
निकाल तारीख : १९/११/२०१९
कालावधी : ०९ वर्ष, ०३ महिने, २४ दिवस

**नि.क. ६**

**महानगर दंडाधिकारी यांचे न्यायालय**
**७१ वे न्यायालय, बांद्रा, मुंबई.**

**(पिठासन अधिकारी प्रगती भा. येरलेकर यांचे समोर)**

| | | |
|---|---|---|
| (१) | फौजदारी प्रकरण क्रं. | : **८३४/पी.डब्ल्यु./२०१०**<br>गु.र. क्रं.: १५९/१०<br>MHMM18-000024-2010 |
| (२) | अपराधाची घटना | : दि. ०३/०४/२०१० रोजी १०.३० ते १९.०० दरम्यान |
| (३) | तक्रारदाराचे नाव | : महाराष्ट्र सरकार,<br>द्वारा — वाकोला पोलीस ठाणे. |
| (४) | आरोपीचे नाव व पत्ता | : विशाल अशोक पाटणे<br>वय :— ३७ वर्षे, धंदा — नाही,<br>रा. पी. ॲन्ड टि कॉलनी, बि. नं. डी/१५, रूम नं. १, तळ मजला, नेहरू रोड, सांताक्रुझ (पू.), मुंबई. |
| (५) | गुन्हयाचे स्वरूप | : भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ अन्वये |
| (६) | गुन्हा कबुल आहे का | : आरोपींनी गुन्हा नाकारला व प्रकरण पुढे चालविणेची तयारी दर्शविली. |
| (७) | आदेश | : आरोपी निर्दोष मुक्त. |
| (८) | आदेशाचा दिनांक | : दि.१९/११/२०१९ |

सरकारतर्फे वकील श्री. ए. ए. शेख

आरोपीतर्फे वकील श्री प्रभाकर इंगळे

## न्यायनिर्णय

(घोषित दि. १९/११/२०१९)

१. आरोपी विरूध्द दोषारोप ठेवण्यात आला आहे की, त्यांनी भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ अन्वये अपराध केला.

२. या प्रकरणात फिर्यादी व इतर साक्षीदार यांना वारंवार साक्ष समन्स काढण्यात आले. परंतु फिर्यादी व इतर साक्षीदार मिळून येत नसल्याचे समन्स बजावणी अहवाल नि.क्र. ४ व ५ वरील अहवालावरून निदर्शनास येते. तपास अधिकारी देखील पुरावा देण्याकरीता हजर झाले नाहीत. फिर्यादींची साक्ष नोंदविली नसल्यामुळे फिर्याद सिध्द झाली नाही. अभिलेखावर आरोपींविरूध्द कोणताही गुन्हादर्शक पुरावा उपलब्ध नाही.

३. अभियोग पक्ष आरोपींचे अपराधीक दायित्व सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र ठरतात. त्यानुसार खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. आरोपी विशाल अशोक पाटणे यांना फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड विधानाचे कलम ३७९ खालील गुन्हयातुन निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.
२. आरोपींची वैयक्तिक बंधपत्रे व जातमुचलका फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ४३७—अ नुसार कायम ठेवण्यात येतात.
३. जप्त केलेले क्रेडीट कार्ड व इतर वस्तु फिर्यादीस परत केल्यामुळे त्याबाबतचे बंधपत्र रद्द करण्यात येते व सदर वस्तुंचा ताबा फिर्यादीकडे कायम करण्यात येत आहे.
४. न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला आहे.

Pragati Bhaskar Yerlekar
Digitally signed by Pragati Bhaskar Yerlekar
Date: 2019.11.19 16:30:31 +0530

दि. १९/११/२०१९.

**( प्रगती भा. येरलेकर )**
महानगर दंडाधिकारी,
७१वे न्यायालय, बांद्रा, मुंबई.

प्रप्रक/—

Dictated on : 19-11-2019
Transcribed on : 19-11-2019
PDF on : 19-11-2019

Dictated on : 02-02-2019
Transcribed on : 02-02-2019
PDF on : 02-02-2019